# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : रविवार 01 जानेवारी 2006
**स्थळ** : 14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे | 7. श्री उत्तम वामन राणे |
| 2. श्री पांडूरंग सावजी राणे | 8. श्री कांता रामचंद्र राणे |
| 3. श्री जयवंत नाना राणे | 9. श्री विनोद विठोबा राणे |
| 4. श्री हेमंतकुमार रमेश राणे | 10. श्री अशोक दत्ताराम राणे |
| 5. श्री सुरेश दत्ताराम राणे | 11. श्री सुनिल सदानंद राणे |
| 6. श्री प्रविण प्रताप राणे | |

उपरोक्त संस्थेच्या कार्यकारीणीची बैठक रविवार दिनांक 01 जानेवारी 2006 रोजी संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांच्या राहत्या घरी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस एकूण 11 सभासद उपस्थित होते. सभेच्या सुरवातीस अध्यक्षांच्या वतीने चिटणीस श्री सुनिल सदानंद राणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेस रितसर सुरवात झाली.

या सभेमध्ये श्री नारायणराव राणे साहेब यांचा सत्कार हा विषय होता. त्या दृष्टीने खालील विषयांवर चर्चा होऊन कार्यकारीणीची मंजूरी मिळविली.

1. यावेळी दिनांक 19 जून 2005 रोजीच्या इतिवृत्ताचे वाचन करून इतिवृत्त मंजूर करण्यात आले.
2. अध्यक्षांनी अशी माहिती दिली की सत्कार समारंभासाठी असलेले स्थळ (बीग हॉल, स्पोर्टस् कॉम्पेल्स, अंधेरी) रु.3000/- भाडे व रु.3000/- अनामत रक्कम असे रु.6000/- भरून राखीव करण्यात आले आहे. या हॉलचे भाडे पुढे श्री विनायक गोडांबे यांचेकडून डोनेशन स्वरुपात मिळणार आहे.
3. सजावट, बैठक, माईक आदि गोष्टींसाठी अंदाजे रु.3500/- एवढा खर्च येणार आहे त्यास मंजूरी.
4. या कार्यक्रमास लागणारे दोन बॅनर्स / होर्डिंग हे श्री विनोद राणे यांचेकडून देणगी स्वरुपात देण्यात येतील असे जाहिर करून त्यांचे आभार मानन्यात आले.
5. श्री विरेन्द्र अनंत राणे यांनी रु.2000/- देणार आहे असे जाहिर केले आहे अशी माहिती मिळाली.
6. सत्कार मूर्ती श्री नारायणराव राणे साहेब व वहिनी यांना या कार्यक्रमानिमित्त भेटवस्तू यासाठी रु.7500/- इतका निधी राखीव करण्याचा निर्णय झाला. भेटवस्तू म्हणून श्री रामेश्वर प्रतिमा, साडी, कुंकू करंडा, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ या वस्तू आणण्याची जबाबदारी श्री अशोक दत्ताराम राणे यांचेवर सोपविण्यात आली.
7. वाडीतील सभासद तसेच मुले याच्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल बक्षिसे देण्यासाठी रु.2000/- इतका निधी मंजूर करण्यात आला.
8. उपस्थितांस जेवणखर्च (डाळ-भात, 2 भाज्या, पुरी) यासाठी रु.20,000/- इतका निधी मंजूर करण्यात आला.
9. निमंत्रण पत्रिका छापण्याची जबाबदारी श्री हेमंतकुमार रमेश राणे यांचेवर सोपविण्यात आली.

10. पुष्पगुच्छ आणण्याची जबाबदारी श्री जयवंत नाना राणे यांचेवर सोपवून त्यासाठी रु.1000/- इतका निधी मंजूर करण्यात आला.
11. फोटोग्राफी (2 रोलपर्यंत) करण्यासाठी रु.1500/- इतका निधी मंजूर करण्यात येऊन त्याची जबाबदारी श्री अशोक दत्ताराम राणे यांचेवर सोपविण्यात आली.
12. सांस्कृतिक कार्यक्रम बसविण्याची (भाषण, डान्स / नृत्य) इत्यादिची जबाबदारी श्री शंकर बाळकृष्ण राणे यांचेवर सोपविण्यात आली.
13. कार्यक्रमासाठी ग्रामस्थाकडून वर्गणी रु.301/- यापर्यंत 15 जानेवारी 2006 पर्यंत जमा करण्यात यावी असे ठरविण्यात येऊन त्याची जबाबदारी श्री सुनिल सदानंद राणे व श्री अशोक दत्ताराम राणे यांचेवर सोपविण्यात आली.
14. श्री नारायणराव राणे साहेब यांचा वाढदिवस 05 फेब्रुवारी रोजी असल्यामुळे तसेच त्यांचे लग्नाचा वाढदिवस असल्याने या दिवशी त्यांना भेटून त्यास शुभेच्छा देण्याचे ठरविण्यात आले.
15. पुढील कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यासाठी दिनांक 15 जानेवारी 2006 रोजी सार्वजनिक सभा बोलविण्याचे ठरविण्यात आले.

या सभेच्या दिवशी श्री मंगेश मनोहर राणे यांच्या कुटुंबियांनी चहापाण्याची उत्तम व्यवस्था केल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभेचा समारोप करण्यात आला.